I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. District (जिल्हा): नांदेड   P.S.(ठाणे): हिमायतनगर
   Year (वर्ष): 2024
   FIR No.(प्रथम खबर क्र.): 0268
   Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 07/11/2024 19:12

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7
2	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7A
3	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	12

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):
   1. Day(दिवस): दरमियानी दिन
      Date From (दिनांक पासून): 22/10/2024
      Date To (दिनांक पर्यंत): 23/10/2024
      Time Period (कालावधी):
      Time From (वेळेपासून): 13:30 वजे
      Time To (वेळेपर्यंत): 16:30 वजे

   (b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
      Date (दिनांक): 07/11/2024   Time (वेळ): 18:24 वजे

   (c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):
      Entry No. (नोंद क्र.): 017
      Date & Time (दिनांक आणि वेळ): 07/11/2024 18:24 वजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):
   1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
      पश्चिम, 12 किमी   Beat No. (बिट क्र.):
   (b) Address (पत्ता): धनवेवाडीजिपशाळेजवळ सार्वजनि, ग्रामपंचायकार्यालदुधवाळ्केवाडी,हिमायतनगर

   (c) In case, outside the limit of this Police Station, then
      (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
      Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
      District(State) (जिल्हा(राज्य)):

Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दत्ता सटवाजी [illegible]

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1970

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)**

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address (पत्ता):**

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	वाळकेवाडी,हिमायतनगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	वाळकेवाडी,हिमायतनगर,हिमायतनगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

Mobile (मोबाइल नं.): 91-7875091434

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	गजानन शामराव मुतनेपाड			1. आनुसयानगर भोकर ,भोकर , नांदेड,महाराष्ट्र,भारत
2	संजय शिवराम माजळकर			1. वाळकेवाडी ,हिमायतनगर,नांदेड, महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.

Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., If any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण प्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत):

दिनांक 07/11/2024 कॅम्प पो.स्टे.

फिर्याद जबाब

हिमायतनगर

मी दत्ता सटवाजी धनवे, वय 54 वर्ष, व्यवसाय रोजगार सेवक व शेती, रा.वाळकेवाडी, ता. हिमायतनगर, जि.नांदेड. मो.78750914334.

समक्ष पोस्टे हिमायतनगर येथे हजर येवुन तोंडी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहतो. आमचे दुधड वाळकेवाडी गावाची निवडणुक सन 2020 मध्ये झालेली असुन त्यावेळी पासुन निवडणुकीचे पॅनल प्रमुख संजय माझळकर हे होते निवडणुक त्यांचे पॅनलने जिंकुन सध्या सरपंच पदी.सोनाबाई रामचंद्र चेलार ही 75 वर्ष वयाची वयोवृध्द महीला आहे.परंतु सरपंच वयोवृध्द /महीला असल्याने तिच्या वतीने ग्रामपंचायतीचा सर्व कारभार हा संजय माझळकर हेच पाहतात.

मी दिनांक. 16/10/2024 रोजी पोलीस उप अधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे हजर राहुन तक्रार दिली असुन ती अशी की, ''मी मागील सन -2007 पासुन ग्रामपंचायत दुधडवाडी ता. हिमायतनगर येथे रोजगार सेवक म्हणुन काम करतो.मला ग्रामपंचायतीचे रोजगार हमी योजने अंतर्गत होणारे एकुण रक्कमेच्या कामामधुन (2.5 टक्के) रक्कम ही मला मानधन म्हणुन मिळते. ग्रामपंचयातीचे वतीने अथवा शासनानचे मला कोणतेही वेतन मिळत नाही.सदरचे रोजगार हमी योजनेचे ग्रामपंचातीचे अंतर्गत मंजुर व केलेल्या कामाचे रक्कम ही ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांचे संयुक्त बॅक खात्यात जमा होवुन त्यांचे मार्फतीने मला बॅक चेकद्वारे मानधन दिले जाते.

ग्रामपंचायत, दुधड वाळकेवाडी, ता.हिमायतनगर येथे रोजगार हमी योजने अंतर्गत मार्च-2023 ते जुन-2024 पावेतो गावातील पांदण रस्ता, सिमेंट रस्ता, बिरसा मुंडा चौकातील पेव्हर ब्लॉक बसविणे इत्यादी कामे केली असुन सदरचे कामाचे एकुण रक्कनेचे मला (2.5 टक्के) मानधन एकुण (35388/-) रूपये गामपंचायतीचे बॅक खाते क 11572915006 स्टेट बॅक ऑफ16/10/2024 रोजी दुपारी 02.00 वा. ग्रामपंचायत दुधड वाळकेवाडी येथे ग्रामसेवक मुतनेपाड यांना विचारणा केली त्यावेळी मुतनेपाड यांनी मला उपसरपंच संजय माझळकर यांचे सोबत बोलण्यास सांगीतले संजय माझळकर यांना मी माझे मानधनाचे चेक देण्यास विनंती केली असता त्यांनी मला 20,000/-रूपयांची मागणी केली आहे. तसेच यांनतर ग्रामसेवक मुतनेपाड यांनी मला सदरचे रूपयां मधुन त्याचे स्वतःसाठी 10,000/रूपये व उप सरपंच संजय माझळकर यांचे साठी 10,000 /रूपयांची अशी एकुण 20,000/रूपयांची मागणी केली आहे.

माझे ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक मुतनेपाड व उप सरपंच संजय माझळकर यांचे सोबत यापुर्वी चे कोणतेही आर्थीक व्यवहार, उधारी रूपये देवाण -घेवाण काही झालेले नाहीत तसेच त्यांचे सोबत माझे कोणतेही भांडण वाद, होवुन वैर दुश्मनी असे काही नाही. त्यांनी मला माझे शासकीय रोजगार सेवकाचे मानधनाचे बॅक चेक सही करून देण्यासाठी अप्रामाणीकपणे स्वतःचे आर्थीक लाभासाठी 20,000 रूपयांची लाच रक्कमेची मागणी केली आहे ही रक्कम त्यांना देण्यास माझा स्पश्ट नकार आहे. सदरचे लोकसेवक यांना भेटण्यासाठी मी दि. 22.10.2024 रोजी 01.00 ते 02.00 या वेळेत जाणार आहे. आपण सदर रोजी सोनारी फाटा, ता. हिमायतनगर येथे पुढील कार्यवाहीकामी येऊन त्यांचे विरूध्द आपले मार्फतीने कायदेशिर कार्यवाही होणेस विनंती आहे.''

मी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 22/10/2024 रोजी दुपारी 13.30 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथील पो.नि.श्री.संदिप थडवे व दोन शासकीय पंच, सापळा पथकासह शासकीय वाहनाणे नांदेड-भोकर-किनवट रोडवरील सोनारी फाटा, ता.हिमायतनगर येथे हजर आले. मी त्यांचे शासकीय वाहनात बसून सोनारी फाटा ते

Scanned with CamScanner

वडाची वाडी जाणारे रोड वर दुधड तलाव येथे एका सुरक्षीत व निर्जण स्थळी थांबलो. त्यानंतर पो.नि. श्री.संदिप थडवे यांनी माझी व दोन्ही शासकीय पंचाची तसेच सापळा पथकातील सदस्याची एकमेकांना ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझे दिलेल्या तक्रारीची माहिती दोन्ही पंचाना तोंडी सांगीतली. तसेच माझी दिनांक 16/10/2024 रोजी दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचानी वाचुन खात्री केली. त्यानंतर पो.नि. श्री.संदिप थडवे, दोन्ही पंच व माझे परिचयात्मक वक्तव्य व्हाईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करुन घेतले. पंच क्र.1 श्री.संदिप इंगोले, पंच क्र. 2 श्री.प्रमोद विश्वनाथ इंगोले व सापळा पथकातील सदस्याना लाचमागणी पडताळणी अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. श्री.संदिप थडवे यांचे सुचने प्रमाणे पोकॉ दाबनवाड यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे गळ्यात अटकावून देवुन माझे सोबत पंच क्र.1 श्री.संदिप मधुकर इंगोले यांना देवुन मोटार सायकल क्रमांक एम.एच.26 ए.एक्स.3607 ने धनवेवाडी येथील जि.प.शाळे जवळ उपसरपंच संजय माझळकर यांची भेट घेवुन लाचमागणी पडताळणी कामी 15.11 वाजता रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.संदिप इंगोले असे आम्ही दोघेजन धनवेवाडी येथील जि. प.शाळे जवळ पोहचलो. तेथे उपसरपंच संजय माझळकर हे हजर होते. त्यांची भेट घेऊन त्यांना माझे रोजगार सेवकाचे मानधनाचे चेक देण्याचे कामा संबधाने बोलणी केली. तेव्हा संजय माझळकर यांनी सांगलो की त्या दिवशी, त्याला पाच द्या, तुम्ही दहा देतो म्हणाल्या म्हण की, तेयला म्हणल्यान दहा आणुन द्या, आण सरपंचाला दहा म्हणले, मी काय म्हणालो तुम्ही दहा घ्या आण सरपंचाला पंधरा द्या असं म्हणल, साहेबाच साहेबाला, सरपंचाच सरपंचाला असा हिशोब झाला म्हण, मला पंधरा द्या, तुम्ही दहा घ्या म्हणाले, वीस दे त्याला, असे म्हणाले.
त्यानंतर मी उपसरपंच माझळकर यांना असे सांगीतले की, तुम्ही ग्रामसेवक मुतनेपाड यांना माझे समक्ष फोन लावून स्पिकर ऑन करुन माझे रोजगार सेवकाचे मानधनाचे चेक देण्याचे कामा संबधाने बोलण्यास विनंती केली. त्यावरुन उपसरपंच माझळकर यांनी त्यांचे स्वतःचे मोबाईल फोनवरून सदर ठिकाणावरुनच ग्रामसेवक मुतनेपाड यांना फोनवर संपर्क केला व फोन चे स्पिकर ऑन करून संभाषण केले. यावेळी ग्रामसेवक मुतनेपाड यांनी कशासाठी मी कमी घेऊ, सगळी जिम्मेदारी माझी, दादा तुमच्यापुढ मी गेलो तर मला जोड्यान मारा, तुमच्या प्रत्येक बाबतीत तुम्ही म्हणले तस वागलो,मी कुठ मागलो काय, नाही हो असं करा जमते, मी कुठपर्यंत कस करू, खाणारे खावुन चालेत, मस्त ऐश करायलेत, माझी काय वाट लावायलेत! द्या मला बारा द्या, एक जास्त द्या तेयला, ऐका मला दहा हजार रूपये भराव लागतात, दोन हजार रूपये माझ्या खिश्यात जातात, बघा दुसर काही नाही आल की, सही करून देतो उद्या, तुमच्या कड घ्या आणी हे करून मला फोन पे ला टाका, वर दहाच टाका मला, मी काय म्हणगा तुम्हाला, गावातील कोणताही पाटील मंडळी, दोन हजाराचा चुना लागला तुम्हालाही माहित हाय असे उपसरपंच माझळकर यांचे सोबत माझे रोजगार सेवकाचे मानधनाचे चेक चे कामासंबंधी संभाषण केले. त्यानंतर मी, उपसरपंच माझळकर यांना ग्रामसेवक मुतनेपाड यांना उद्या माझा चेक मला देण्यास सागा असे बोलून त्यानंतर मी व पंच क्र.1 संदिप इंगोले असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 15.37 वाजता परत आलोत. सदर ठिकाणी पोहचल्यानंतर माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर बंद केल्यानंतर पो.नि.श्री.संदिप थडवे यांनी पच क्र.1 श्री.संदिप इंगोले व माझेकडे आम्ही दुधड तलाव येथुन रवाना होऊन परत येईपर्यंत घडलेल्या घटने संबंधाने सविस्तर वेगवेगळी विचारपुस केली. त्यानंतर दोन्ही पंच व माझे समक्ष लाचमागणी पडताळणी दरम्यान व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुन त्यात उपसरपंच माझळकर यांनी व ग्रामसेवक मुतनेपाड यांनी माझे रोजगार सेवकाचे मानधनाचे चेक सही करून देण्यासाठी उपसरपंच माझळकर यांनी सरपंचाचे नाव पुढे करून स्वतःसाठी 15,000/-रू. व ग्रामसेवक यांनी त्यांचे स्वतःसाठी 10,000/-रू. लाचेची मागणी केले असल्याची खात्री केली.
दि.22.10.2024 रोजी ग्रामसेवक मुतनेपाड हे ग्रामपंचायत कार्यालयात हजर नसल्याने तसेच लाच मागणी पडताळणी झाले नंतर वेळ दुपारी 16.00 वाजता धनवेवाडी येथुन उपसरपंच संजय माझळकर हे धनवेवाडी येथुन बाहेर गावी कोठेतरी अन्य ठिकाणी निघुन गेल्याने, माझे विनंती वरून दि.23.10.2024 रोजी ग्रामसेवक मुतनेपाड यांची भेट घेऊन त्यांना त्यांचे मागणीप्रमाणे लाच रक्कम देण्याचे पो.नी.संदिप थडवे पंच व सापळा पथकाने ठरविले. त्यानंतर दि.23.10.2024 रोजी 12.20 वाजता पो.नि. श्री.संदिप थडवे हे दोन पंच व सापळा पथकासह खाजगी वाहन क्रुझर जीप क्र. एम.एच.26 ए.के.5336 ने नांदेड-भोकर-किनवट रोडवरील सोनारी फाटा, ता.हिमायतनगर येथे हजर आले. मी त्यांचे खाजगी वाहनात बसून सोनारी फाटा ते वडाची वाडी जाणारे रोड चे बाजुला एका सुरक्षीत व निर्जण स्थळी थांबलो. सदर ठिकाणी पो.नि.श्री.संदिप थडवे यांनी मला 25,000/- रुपये हजर करण्यास सांगीतले त्यावेळी मी माझे कडे 20,000/-रू. असल्याचे सांगून 20,000/- रुपये ज्यात पाचशे रुपये दराच्या 40 चलनी नोटा हजर केल्या असता ते पो.नि.श्री.संदिप थडवे यांनी पंचासमक्ष ताब्यात घेवून पंच क्र.2 प्रमोद इंगोले यांचेद्वारे सदर नोटांचे वर्णन व क्रमांक नोंदवुन घेतले. त्यानंतर खाजगी वाहनात मला तसेच दोन्ही पंचाना अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन अँन्थ्रासिन पावडरचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर मी हजर केलेल्या पाचशे रुपये दराच्या 40 चलनी नोटास अँन्थ्रासीन पावडर लावुन त्या नोटा माझे पॅन्टच्या उजव्या बाजूच्या खिशात ठेवुन

Scanned with CamScanner

दिल्या.
त्यानंतर पो.नि.श्री.संदिप थडवे यांनी सापळा कार्यवाहीचे अनुषंगाने मला, दोन्ही पंचास तसेच सापळा पथकातील सर्व सदस्यांनी कोणी काय करावे या बाबत सविस्तर सुचना दिल्या. तसेच मला ग्रामसेवक मुतनेपाड यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर करावयाचा ईशारा समजावुन सांगुन सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर 13.23 वाजता पोकॉ. दाबनवाड यांनी पो.नि.श्री.संदिप थडवे यांचे सुचने प्रमाणे व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझे गळ्यात सुरक्षीत लटकावून देवून हिरो स्प्लेंडर मोटार सायकल क्र. एम.एच.26 ए.यु.3983 ने ग्रामपंचायत कार्यालय, वाळकेवाडी येथे रवाना केले. व आमचे मो.सा.चे मागोमाग खाजगी वाहनाने पो.नि.श्री.संदिप थडवे, पंच क्र.2 व सापळा पथकासह वाळकेवाडी येथे आले. ग्रामपंचायत कार्यालया जवळ पोहचल्यानंतर मी व पंच क्र1 श्री.संदिप इंगोले कार्यालयाकडे पायदळ रवाना झालो. तसेच पो.नि. श्री.संदिप थडवे व सापळा पथकातील सदस्य, पंच क्र.2 असे वेगवेगळे वाहनातून उतरून पायदळ आमचे पाठोपाठ आले व सुरक्षीत ठिकाणी परिसरात थांबले.
त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.संदिप इंगोले असे आम्ही दोघजन मिळुन ग्रामपचायत कार्यालयात ग्रामसेवक मुतनेपाड यांची त्यांचे कक्षात भेट घेवुन त्यांना मी, रामराम साहेब असे बोललो असता ग्रामसेवक मुतनेपाड यांनी रामराम आलोच जरा थांबा थोडं असे मला बोलुन त्यांचे कक्षाचे व ग्रामपंचायतीचे कार्यालयाचे बाहेर फोनवर बोलत निघुन गेले. यानंतर मी व पंच क्र 01 संदिप इंगोले तेथेच थांबून ग्रामसेवक मुतनेपाड हे कार्यालयात परत येण्याची वाट पाहत थांबलो. परंतू बराच वेळ होवुन ते कार्यालयात परत न आल्याने मी ग्रामसेवक मुतनेपाड यांना कॉल केला असता त्यांचा फोन एंगेज येत होता. त्यानंतर आम्ही बराच वेळ तेथे थावून होतो परंतू ग्रामसेवक मुतनेपाड परत आले नाही किवा त्यांचा फोन सुध्दा आला नाही. यावरून माझे बाबत ग्रामसेवक मुतनेपाड याना काही शंका आली असावी अशी माझी समजुत झाल्याने मी, पंच क्र.1 संदिप इंगोले यांचे सह ग्रामपंचायत कार्यालयातुन परत येण्याचा मी निर्णय घेतला व सापळा पथक यांना कोणताही इशारा न करता सापळा पथकाचे वाहन थांबलेल्या ठिकाणी मो.सा.ने वेळ 14.46 वा. परत आलो यावेळी पो.कॉ.दाबनवाड यांनी माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरक्षीत काढुन बंद केले व पो.नी.संदिप थडवे यांनी पंच क्र 01 व मला मो.सा.ने ग्रामसेवक यांचे कडे रवाना करून परत येणे पर्यन्त चा घटनाक्रम विचारला व व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण मोठे आवाजात ऐकले. यानंतर परत ग्रामसेवक मुतनेपाड हे ग्रामपंचायत कार्यालयात परत येताच त्यांची भेट घेवुन त्यांना लाच रक्कम देण्याचे आम्ही ठरविले व सापळा पथकासह वाळकेवाडी गावाचे परिसरात सुरक्षीत निर्जन स्थळी थावुन ग्रामसेवक मुतनेपाड हे ग्रामपचांयत कार्यालयात परत येण्याची वाट पाहीली मी ग्रामसेवक यांचे बाबत खाजगी रित्या अधीक माहीती घेतली असता ते भोकर येथे गेले असल्याचे मला समजले सदरची माहीती मी पो.नी.संदिप थडवे व सापळा पथकास दिली यावेळी माझे विनंती वरून ग्रामसेवक मुतनेपाड हे ज्या रोजी ग्रामपंचायत वाळकेवाडी कार्यालयात हजर येतील त्या रोजी परत सापळा कार्यवाही करण्याचे ठरविले.
दि.23/10/2024 पासुन मी माझे वाळकेवाडी गावात हजर राहुन ग्रामसेवक मुतनेपाड यांची वाट पाहत आहे परंतु ग्रामसेवक मुतनेपाड हे आज दि.07/11/2024पावेतो ग्रामपंचायत कार्यालयात हजर आले नाहीत. तसेच माझे रोजगार सेवकाचे मानधनाचा चेक मला सही करून दिलेला नाही.
यावरून आज रोजी माझे सांगणे आहे की, दि.22/10/2024 व दि.23/10/2024 रोजी ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथील पथक व दोन पंच यांचे सह केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान माझे वागण्या वरून तसेच माझे सोबत गावात पंच क्र.1 हे नवीन इसम हजर असल्याचे पाहुन उप सरपंच संजय माझळकर व ग्रामसेवक गजानन मुतनेपाड यांना शंका आलेली आहे. त्यामुळे ग्रामसेवक गजानन मुतनेपाड व उपसरपंच संजय माझळकर हे आता माझे रोजगार सेवकाचे मानधनाचे चेक देण्यासाठी त्यांनी लाच रक्कम मागणी केल्या प्रमाणे माझे सोबत कोणतेही संभाषण करणार नाहीत व माझेकडून लाच रक्कम स्विकारणार नाहीत, अशी माझी पुर्ण खात्री झालेली आहे.
तरी माझे तक्रारीवरून दिनांक 22/10/2024 रोजी ला.प्र.वी. कार्यालय नांदेड येथील सापळा पथक व दोन शासकीय पंच यांनी लाच मागणी व पडताळणी कार्यवाही वेळ 15.11 ते 15.37 वाजताचे दरम्यान धनवेवाडी, ता. हिमायतनगर येथील जि.प.शाळा जवळ उपसरपंच संजय माझळकर यांनी पंचासमक्ष मला माझे रोजगार सेवकाचे मानधनाचे 35,388/- रूपयांचे चेक सही करून देण्याचे कामाचे संबंधाने दुधड वाळकेवाडी, ता.हिमायतनगर येथील सरपंचाचे नाव पुढे करून स्वतःसाठी 15,000/- रुपये व सदर घटनास्थळावरून पंचासमक्ष संजय माझळकर यांनी त्यांचे मोबाईल फोनवरून स्पिकर ऑन करून ग्रामसेवक गजानन मुतनेपाड यांचे सोबत केलेल्या संभाषण दरम्यान ग्रामसेवक गजानन मुतनेपाड यांनी स्वतःसाठी 10,000/- रूपयांची स्वतःचे आर्थीक लाभासाठी अप्रामाणीकपणे लाच रक्कमेची मागणी केली आहे. त्याचे विरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Amol Haridas Bhagat(I (Inspector)) / PBMAH81369 or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / Informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा): दत्ता सटवाजी थळवे

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

आज दिनांक 7/11/2024 रोजी मला पोस्टे शिवाजीनगर येथेच FIR प्रत ताब्यात देण्यात आली.
दत्ता सटवाजी थळवे

Signature of Officer in Charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

Name (नाव): Amol Haridas Bhag
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PBMAH81369

Scanned with CamScanner